ePaper


## तर मी राजकारणातून निवृत्त होईन": रामदास कदम



| वर्ष - 7 । अंक - 317 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- शशांक पंजाबच्या विजयाचा शिल्पकार
- लक्ष वेधणारा 'श्रीवल्ली'चा लूक
- 'वंचित'वारंवार उमेदवार बदल का?
- शिंदेंची अवस्था 'ना घर का ना घाट का'

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 6 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# काळ्या काचांच्या वाहनचालकांवर पोलिसांची मोठी कारवाई!

## सात दिवसांत 3435 वाहनांवर कारवाई करत 37 लाख 91 हजारांचा दंड वसूल

। पिंपरी । महाईन्यूज

**शहरात काळ्या काचांच्या वाहनचालकांवर पिंपरी चिंचवड वाहतूक विभागाच्या पोलिसांनी कडक कारवाई केली आहे. सात दिवसांत तब्बल ३४३५ वाहनांवर कारवाई करत ३७ लाख ९१ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेतर्फे दि.२९ मार्च ते ०४ एप्रिल या सात दिवसांच्या कालावधीत काळी काच लावणाऱ्या वाहनचालकांविरोधात ही विशेष मोहीम राबवण्यात आली असल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिली.**



आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तसेच गुन्हेगारीस आळा घालण्याकरिता पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात चारचाकी वाहनास काळी काच लावणाऱ्या वाहनचालकांच्या विरोधात दि.२९ मार्च ते ०४ एप्रिल दरम्यान विशेष मोहिम राबविण्यात आली. यात चारचाकी वाहनांस काळी काच (टेन्टेड ग्लास) लावलेल्या एकुण ३४३५ वाहनांवर वाहतुक विभागांमार्फत कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ३७ लाख ९१ हजार ५०० रुपये एवढा दंड आकारण्यात आलेला आहे.

### वाहतूक नियमांचे पालन करण्याचे नागरीकांना आवाहन

दरम्यान, यापुढे देखील अशाच प्रकारे वेगवगळ्या हेडखाली वाहतुक शाखेमार्फत विशेष मोहिम राबवून कारवाई करण्यात येणार आहे. तरी नागरीकांनी वाहतूक नियमांचे पालन करुन त्यांच्यावर होणारी दंडात्मक तसेच न्यायालयीन कार्यवाही टाळावी असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.

# राज्यात पुढील ४ दिवस पावसाचा इशारा; तापमानातही वाढ

## हवामान विभागाचे प्रमुख के. एस. होशाळीकर यांचे ट्विट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रासह संपूर्ण देशात एका ठिकाणी उन्हाचा तडाखा तर दुसरीकडे मेघगर्जनेसह पाऊस पाहायला मिळत आहे. हवामान खात्याने पुढील चार दिवसात पावसाची शक्यता वर्तवली आहे. पुणे हवामान विभागाचे प्रमुख के. एस. होशाळीकर यांनी केलेल्या ट्विटमध्ये महाराष्ट्रात 5 एप्रिलपासून पुढील 4 दिवस मेघगर्जनेचा इशारा दिला आहे.**



एवढंच नव्हे तर या काळात तापमानातही दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज देखील वर्तवला आहे. शुक्रवारपासून हवेत आद्रता वाढलेली पाहायला मिळणार आहे. पाच ते आठ एप्रिल दरम्यान मध्य महाराष्ट्रात असं वातावरण असेल.

तर सहा ते आठ एप्रिल या काळात कोकण, मराठवाड्यात आणि सात ते आठ एप्रिल दरम्यान विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

### अवकाळी पावसाची शक्यता

राज्यात अक्षरशः सूर्य आग ओकत आहे. आतापर्यंत तापमानाची नोंद ही 40 डिग्री सेल्सिअस पर्यंत नोंदवली आहे. पुढील काही दिवस उष्णतेची लाट येण्याचा देखील इशारा हवामान विभागाने वर्तवला आहे. तर काही जिल्ह्यात पारा हा 40 पार गेला आहे. अशातच हवामान खात्याकडून अवकाळी पावसाची शक्यता वर्तवली आहे. या आठवड्याच्या शेवटच्या दिवसांमध्ये पाऊस पडणार आहे.

# महाविकास आघाडीत कसबा पॅटर्नची चर्चा!

## » मात्र काँग्रेसमध्ये गोंधळ नाराजांचा! अंतर्गतवाद पुन्हा चव्हाट्यावर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस कडून कसब्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. धंगेकर यांना उमेदवारी मिळाल्याने काँग्रेसमध्ये असणाऱ्या इतर इच्छुकांमध्ये नाराजीची लाट पसरली आहे. माजी उपमहापौर आबा बागुल यांनी खुळेपने आपण नाराज असल्याचं जाहीर करत काँग्रेसभवनमध्ये मुक आंदोलन केलं.**





तर अद्यापही शहरातील प्रमुख नेत्यांमध्ये असणारा अंतर्गत कलह थंडावताना दिसत नाही. काल धंगेकर यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी केसरीवाड्यामध्ये मेळावा पार पडली. यावेळी देखील हा वाद कायम राहिल्याने धंगेकर यांच्यासाठी डोकेदुखी वाढताना दिसत आहे.केसरी वाड्यामध्ये आयोजित मेळाव्याला काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख गजानन थरकुडे, माजी आमदार मोहन जोशी, माजी मंत्री रमेश बागवे, जेष्ठ नेते अंकुश काकडे यांच्यासह महाविकास आघाडीचे इतर नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कसब्यातील पोटनिवडणुकीची पुनरावृत्ती करण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला. मात्र एका बाजूला विजय मिळवण्याच्या आरोळ्या ठोकल्या जात असताना दुसरीकडे उपस्थित काँग्रेस नेत्यांमध्ये मात्र नवा वाद दिसून आला.

### धंगेकर यांची डोकेदुखी वाढवणार

» झालं असं की, महाविकास आघाडीचा मेळावा सुरू असताना रोहित टिळक हजर झाले, मात्र ते सभागृहात आल्यानंतर काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी काढता पाय घेतल्याने चर्चेचा विषय बनला आहे. धंगेकरांची उमेदवारी जाहीर होऊन पंधरा दिवस उलटल्यानंतरही काँग्रेसमध्ये नाराजी नाट्य कायम असल्याचं यावरून दिसून आलं. त्यामुळे कसबा पॅटर्नची चर्चा सुरू असली तरी नाराजीचा हा पॅटर्न मात्र धंगेकर यांची डोकेदुखी वाढवणार आहे.

---

# मोहोळांसाठी भाजपचे “घर चलो अभियान”

## » 12 लाख नागरिकांपर्यंत पोहोचणार; भाजपनेही कसली कंबर

।भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभेसाठी महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर आणि वंचितचे वसंत मोरे अशी तिरंगी लढत होणार आहे. तीनही उमेदवार तुल्यबळ असल्याने दिवसेंदिवस प्रचाराला वेग आला असून प्रचाराच्या नवनव्या रणनीती आखल्या जात आहेत.**



आता महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्यासाठी भाजपनेही पक्ष पातळीवर कंबर कसली असून पक्षाच्या वतीने भाजपच्या वर्धापन दिनी (६ एप्रिल) “घर चलो अभियान” राबवण्यात येणार आहे.येत्या ६ एप्रिल रोजी भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त भाजपकडून “घर चलो अभियान” राबवण्यात येणार आहे. मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी भाजप पुणे शहरात ३ लाख घरांमध्ये एक विशेष पत्रक वाटले जाणार आहे. यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री चंद्रकांत पाटील देखील अभियानात सहभागी होणार आहेत.

पुण्यातील महायुतीचे सर्व स्थानिक आमदार देखील घरोघरी जात पत्रक वाटणार आहे. दरम्यान, या माध्यमातून भाजपचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचणार आहेत. या माध्यमातून प्रत्येक पुणेकरांना भाजपला मतदान करण्याचं आवाहन करण्यात येणार आहे. साधारण पुण्यात १० ते १२ लाख नागरीकांना हे पत्रक वाटप करण्यात येणार आहे.

### वसंत मोरे यांचाही प्रचार जोरात

» काँग्रेसचे रवींद्र धंगेकर हेही विविध माध्यमातून प्रचार करत आहेत. परंतु, अद्याप पक्षांतर्गत नाराजीमुळे त्यांच्या प्रचारात पाहिजे त्याप्रमाणात जोर अद्याप दिसून येत नाही. दरम्यान, काँग्रेसमधील नाराजीमुळे पक्षाच्या उमेदवाराला कोणताही त्रास होऊ नये, यासाठी काँग्रेसचं केंद्रिय पथक पुण्यात दाखल झालं आहे. दुसरीकडे वसंत मोरे यांची नुकतीच उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनीही प्रचाराला सुरुवात केली आहे.

# गावातील प्रश्नांना न्याय, मावळ लोकसभेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध!

## संजोग वाघेरे : मतदारांना दिली विश्वासाला तडा जावू न देण्याची ग्वाही

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा गावभेट दौरा



। सोमाटणे।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघातील अनेक गावांशी खूप जुने नाते आहे. गेल्या दहा वर्षात मावळ लोकसभेत काही कामे झालेली नाहीत. त्या समस्या सोडविण्याचे काम आपण करु. स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी मी प्राधान्याने प्रयत्न करणार आहे. चांगल्या पद्धतीने काम होईल, ही माझी जबाबदारी आहे. मावळ लोकसभेच्या सर्वांगीण विकासासाठी व गावातील प्रश्नांना न्याय देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला मतदान करा. तुमच्या विश्वासाला तडा जावू देणार नाही, अशी ग्वाही देत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी मतदारांना साद घातली.**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या गावभेट दौ-यास मतदार संघातील कार्यकर्त्यांन सोबत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी वाघेरे पाटलांचे मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार गौतम चाबुकस्वार, पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक दत्ता वाघेरे, सांगवडे गावचे सरपंच रोहन जगताप, जिल्हा संघटिका शैलजा खंडागळे, भाऊसाहेब पानमंद, भारती राक्षे, शिवाजी राक्षे, सुरज राक्षे, दशरथ राक्षे, बाळासाहेब आंब्रे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, युवा कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज शुक्रवारी (दि. 5) रोजी सकाळी नऊ वाजता सुरू झालेल्या गाव भेट दौऱ्यात सोमाटणे, शिरगाव, गहुंजे, साळुंब्रे, गोडुंब्रे, सांगवडे, दारुंब्रे, कुसगाव, पाचाने, राजेवाडी, दिवडे, ओव्हळे, डोणे, आढले ब्रु, आढले खु, चांडखेड, बेबड - ओहळ, परंदवडी आदी गावांमधून संजोग वाघेरे पाटील यांच्यासह शिवसेना व महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत प्रचार गावभेट दौरा उस्फुर्तपणे पार पडला. यावेळी गावागावातून वाघेरे पाटील यांची मिरवणूक काढून, फटाके वाजवून संजोग वाघेरे पाटलांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. आता फक्त "बदल घडणारच" असा निर्धार मावळ वासियांनी या वेळी केला.

### "एकच ध्यास, मावळचा विकास"

» दरम्यान, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची प्रतिमा डोळयासमोर ठेवून कार्यकर्त्यांनी कामाला लागावे "एकच ध्यास, मावळचा विकास" अशी ओळख कायम राखण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिलेदार उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना मोठया मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन मावळ लोकसभा मतदारसंघातील गावभेट दौऱ्यात पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मतदारांना केले.

---

# महायुतीचा बालेकिल्ला असलेल्या संत तुकाराम नगरमध्ये श्रीरंग बारणे यांच्या भेटीगाठी..!

## फटाके वाजवून, औक्षण करीत मोठ्या उत्साहात स्वागत

।पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप- राष्ट्रवादी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी महायुतीचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत तुकाराम नगर भागास भेट देऊन प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या. फटाके वाजून, औक्षण करीत त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.**



भाजपचे ज्येष्ठ नेते व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसेविका सुजाता पालांडे, मुक्ता पडवळ, भाजपचे पदाधिकारी महेंद्र बाविस्कर, शिवसेना वाहतूक सेनेचे संजय यादव, संत तुकाराम नगर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष किरण सुवर्णा, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले यांच्या निवासस्थानी तसेच सोहम लायब्ररी व एकता विकास मंडळ या ठिकाणी खासदार बारणे यांनी सदिच्छा भेट दिली.

संत तुकाराम नगर भागात भाजप, शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी ताकद आहे. तिन्ही पक्षांची महायुती असल्यामुळे या भागात खासदार बारणे यांना एकतर्फी मतदान होईल, असा विश्वास सदाशिव खाडे यांनी व्यक्त केला. खासदार बारणे यांनी कामगारांच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष द्यावे व कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा यशवंत भोसले यांनी व्यक्त केली. सर्व कामगार महायुतीच्या पाठीशी राहतील अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

### खासदार बारणे यांना दिल्या शुभेच्छा

» खासदार बारणे यांच्या समवेत माजी नगरसेवक जितेंद्र ननावरे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती मायला खात्री, माणिकराव अहिरराव तसेच राजेश वाबळे, मंगेश दाडगे, माऊली जगताप, लक्ष्मण रानवडे, उमेश पाटील, रवींद्र नामदे, जगन्नाथ नेरकर तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते. त्यापूर्वी कासारवाडी येथे माजी नगरसेविका सुरेखा लांडगे तसेच ज्येष्ठ नेते दत्तात्रय लांडगे यांच्या निवासस्थानी खासदार बारणे यांनी भेट दिली. भाजप नेते माऊली थोरात व प्रकाश जवळकर यांनीही खासदार बारणे यांना शुभेच्छा दिल्या.




# एसटीच्या मार्गात आचारसंहितेचा अडथळा

**राज्याच्या वार्षिक अर्थसंकल्पात एसटी बसेस खरेदीसाठी ९१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असतानाही, केवळ हा निधी वेळेत न दिल्यामुळे बस खरेदी रखडली आहे. आता आचारसंहिता संपेपर्यंत याबाबत काहीही होणे शक्य नाही. परिणामी कर्मचारी आणि प्रवाशांना गैरसोय सहन करावी लागणार हे निश्चित!**

आचारसंहिता लागू होण्यापूर्वी २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीचा विनियोग व्हावा यासाठी राज्य सरकारने विकासकामांच्या उद्घाटनांचा सपाटा लावला आणि तरीही राज्य सरकारच्या नियोजनशून्य कारभाराचा व लोकसभेच्या निवडणूक आचारसंहितेचा फटका एसटीला बसला आहे. स्थानक नूतनीकरणासह काही कामे अपूर्णच राहिली आहेत. त्यामुळे करोना कालावधी व संपानंतर जोरदार उभारी घेत वेग पकडलेल्या एसटीच्या कारभाराला सरकारच्या नियोजनशून्यतेमुळे 'ब्रेक' लागला आहे.उदाहरणासह स्पष्ट करायचे झाल्यास राज्याच्या २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात एसटीला दोन हजार २०० नवीन स्वमालकीच्या गाड्या घेण्यासाठी ९१२ कोटी रुपयांची तरतूद कागदोपत्री करण्यात आली होती. ती रक्कम काही एसटी महामंडळाकडे आलीच नाही. परिणामी जनतेला हव्या असलेल्या 'लाल पऱ्यां'ची खरेदी लांबणीवर पडली आहे.



आता ही खरेदी किमान सहा ते आठ महिने लांबणीवर जाईल, हे स्पष्टच दिसते. त्यातच १५ वर्षे वापरण्यात आलेल्या आणि आता भंगार झालेल्या गाड्या काढून नव्या गाड्या घेण्याचा संकल्पही सरकारच्या बेफिकिरीमुळे कागदावरच राहणार आहे. हा संकल्प आता आचारसंहितेच्या विळख्यात अडकला आहे. अगदी कंत्राटी विद्युत गाड्यांची मागणीही पूर्ण करण्यासंदर्भात हालचाली होऊ शकत नसल्याने सामान्यांची गैरसोय होणार आहे. राज्याच्या वार्षिक अर्थसंकल्पात एसटी बसेस खरेदीसाठी ९१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, ही रक्कम सरकारच्या नियोजनशून्य कारभारामुळे व आचारसंहिता लागू होण्यापूर्वी विनियोग करण्यात न आल्यामुळे एसटी महामंडळाला मिळालीच नाही. किंबहुना आचारसंहितेपूर्वी ही रक्कम एसटीच्या ताब्यात यावी, यासाठी सरकारने कुठलेही प्रयत्न केले नाहीत. मार्चअखेरीस आर्थिक वर्ष संपणार व आचारसंहिता लागू होणार हे माहीत असूनही त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले का, असा प्रश्न पडतो. आता ही रक्कम मिळण्याची शक्यता धूसर झाली आहे. किंबहुना मिळणारच नाही, असे दिसते. एसटी महामंडळाने कंत्राट दिलेल्या विजेवर चालणाऱ्या बसगाड्याही नियोजित वेळेत येणार नसल्याने याचाही फटका सामान्यांना बसणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने १६ मार्चला पत्रकार परिषद घेऊन देशातील सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम व वेळापत्रक जाहीर केले. लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली होती. या काळात सरकारला कोणतेही नवे धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत किंवा प्रकल्पांची घोषणा, भूमिपूजन, उद्घाटनादि कार्यक्रम करता येत नाहीत. परिणामी प्रशासकीय निर्णय आणि नवी विकासकामे हाती घेण्याची प्रक्रिया जवळपास ठप्पच होते. साहजिकच एसटी महामंडळालासुद्धा याचा मोठा फटका बसला आहे.१५ वर्षे होऊन गेलेल्या जवळपास एक हजार गाड्या भंगारात काढणे आवश्यक असतानाही नव्या गाड्या दाखल होण्यास उशीर होत आहे. यामुळे प्रवाशांच्या गैरसोयीत भर पडणार आहे. दोन हजार २०० डिझेलवरील स्वमालकीच्या गाड्या खरेदीचे कंत्राट कंपनीला देण्यात येणार आहे, मात्र त्याचे पैसे देण्यासाठी महामंडळाकडे निधीच नसल्याने वर्कऑर्डर देता आलेली नाही. परिणामी महामंडळाला नवीन गाड्या मिळण्यास उशीर होणार आहे. आचारसंहिता ५ जूनला संपत असल्याने त्यानंतरच या गाड्यांची वर्कऑर्डर दिली जाऊ शकते. नियमाप्रमाणे वर्कऑर्डर दिल्यानंतर या गाड्या मिळण्यास किमान तीन महिन्यांनी सुरुवात होईल व सर्व बस रस्त्यावर येण्यास आणखी सहा ते आठ महिने लागण्याची शक्यता आहे. साहजिकच या काळात एसटीने प्रवास करणाऱ्या नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागणार आहे. सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात एकूण १५ हजार गाड्या असून त्यातील एक हजार गाड्या येत्या सहा महिन्यांत १५ वर्षे पूर्ण झाल्याने भंगारात काढाव्या लागणार आहेत.

## संपादकीय »

### दुष्काळाशी सामना

***बदलत्या हवामानामुळे भविष्यात ओला व कोरड्या दुष्काळाची समस्या तीव्र होत जाणार आहे.***

बदलत्या हवामानामुळे भविष्यात ओला व कोरड्या दुष्काळाची समस्या तीव्र होत जाणार, अशी शक्यता अमेरिका, युरोपसह जगभरातील अनेक पर्यावरणतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. अवकाळी, गारपीट, पूर, वादळामुळे होणारी पिकांची, भाजीपाल्याची व फळबागांची हानी कशी रोखता येईल, किमान कमी कशी करता येईल, हे पाहायला हवे. गेल्या काही वर्षांपासून देशाबरोबरच महाराष्ट्रात अवकाळी पावसाने धुडगूस घातला आहे. आता भूतकाळात जमा झाला आहे. मान्सून मागे फिरल्यानंतर येणारा सुखद व पोषक हिवाळा ही आता कविकल्पना होत चालली आहे. याचे कारण गेल्या काही वर्षांपासून नियमितपणे येणारा अवकाळी पाऊस होय. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, कोकण भागातील व आसपासच्या अनेक भागात भाताची लागवड मोठ्या प्रमाणात होते व नेमकी भातकाढणीची वेळ होताच वरुणराजाचे आगमन ही नित्याचीच बाब झाली आहे. यामुळे शेतीचे व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

ऐन निवडणुकीच्या काळात मद्य उत्पादनशुल्काच्या कथित गैरव्यवहारावरून सुरू असलेल्या वादळी घटनांना संजयसिंह यांच्या सुटकेमुळे नवे वळण मिळाले आहे. कथित शंभर कोटी रुपयांच्या गैरव्यवहारातील एकही पैसा, तसेच त्याचे झालेले हस्तांतर या कशाचाही छडा लावण्यात यंत्रणांना यश आलेले नाही.

# संजयसिंह यांच्या सुटकेमुळे नवे वळण

संजयसिंह यांच्या जामीन अर्जाला केंद्र सरकारने न्यायालयात विरोध केला नाही. दिल्ली, पंजाबात सत्तेत असलेल्या आपचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी मुख्यमंत्री मनिष सिसोदिया, माजी मंत्री डॉ. सत्येंद्र जैन आदी मंडळी तुरुंगात आहेत. लोकसभा निवडणुकीचा प्रचार वेग घेत असताना आपच्या गोटात नेतृत्वाचा निर्माण झालेला दुष्काळ पक्षाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. त्यामुळेच या सगळ्या प्रकरणामागे फक्त राजकारण आहे की काय, अशी शंका येऊ शकते. त्या पार्श्वभूमीवर पक्षाची राज्यसभेतील बुलंद तोफ म्हणून ओळख असलेल्या संजयसिंह यांची सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जामिनावर झालेली मुक्तता लक्ष वेधणारी आहे. दिल्लीत आपने उत्पन्नवाढीच्या नावाखाली नवे उत्पादनशुल्क धोरण आणले. त्यातून सरकारची तिजोरी भरण्याऐवजी आपचे आणि त्यांच्या नेत्यांचे भले झाले, असा



आरोप आहे. साधारण दोन-अडीच वर्षे कथित मद्यधोरण गैरव्यवहार गाजतो आहे. एवढ्या कालावधीतही संजयसिंह यांच्याविरुद्ध ठोस पुरावे गोळा करण्यात अपयश आले, याचा अर्थ काय लावायचा? संजयसिंह, केजरीवाल यांच्यावर पैशाच्या अफरातफरीचे आरोप आहेत. संजयसिंह यांच्यावर एका व्यापाऱ्याच्या जबाबावरून कारवाई केली गेली. अरोराने या मद्यधोरण प्रकरणात साऊथ लॉबी (दक्षिणेतील व्यापारी) आणि आप नेते यांच्यात मध्यस्थाची भूमिका पार पाडल्याचा आरोप आहे. अरोराचे आणि संजयसिंह यांचे संबंध आहेत, त्यानेच त्यांना दोन कोटी रुपये देऊ केले, दिल्लीतील हॉटेल, बारचालकांकडून हफ्तेवसुली करून पैसे मिळण्याची व्यवस्था केल्याचा आरोप आहे. अरोराने दिलेल्या दहाव्या जबाबात संजयसिंह यांचे नाव घेतले, त्याआधीच्या नव्हे. हेच त्यांच्या सुटकेसाठी ठरलेले एक प्रबळ कारण आहे; त्याशिवाय अटककाळात त्यांच्या मालमत्तेवर टाच आणलेली नाही, त्यांच्याकडे संपत्ती सापडलेली नाही, हे लक्षात घेऊन न्यायालयाने जामीन मंजूर केला.त्याआधी स्थानिक आणि उच्च न्यायालयाने जामीन नाकारला होता. या निकालाला न्यायिक आणि राजकीय अशा दोन्हीही पातळ्यांवर महत्त्व आहे. मनीलॉंड्रिंग विरोधी कायद्याच्या (पीएमएलए) कलम ४५च्या तरतुदीच्या आधारे न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अशा स्वरुपाचा जामीन देताना अशा खटल्यात आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करणारा प्रथमदर्शी पुरावा नाही आणि जामिनावर असताना अशा प्रकारचा आरोपी कोणताही गुन्हा करणार नाही, या दोन निकषांवर न्यायालय जामीन मंजूर करते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदेची अवस्था ‘ना घर का ना घाट का‘!

## शिंदे गटाचे अनेक आमदार ठाकरेंच्या संपर्कात : विजय वडेट्टीवार

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारांचे चित्र आता जवळपास स्पष्ट झाल्यानंर राजकीय पक्ष आणि पुढारी प्रचाराला लागले आहेत. त्यामुळे एकमेकांच्याविरोधात टीका-टिप्पणीला जोर आला आहे. महायुतीच्या जागावाटपात शिंदे गटाला झुकते माप घ्यावे लागले. त्यांनी जाहीर केलेल्या एका उमेदवाराला ऐनवेळी मागे घ्यावे लागले तर यवतमाळच्या विद्यमान खासदाराचा पत्ता कट करण्यात आला. यामुळे शिंदे गटावर महाविकास आघाडीतर्फे टीका होत आहे.**



विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही माध्यमांशी बोलताना शिंदे गटावर जोरदार टीका केली. ‘ना घर का ना घाट का’, अशी शिंदे गटाची अवस्था झाल्याचे वडेट्टीवार म्हणाले.शिंदे गटावर टीका करताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले, ‘ना घर का ना घाट का’, अशी वेळ शिंदे गटावर आली आहे. उद्धव ठाकरे भेटत नाही, अशी सबब सांगून शिंदे गट बाहेर पडला. पण आता त्यांना लोकसभेचे मतदारसंघही भेटत नाहीत, हे सर्वच पाहतायत. शिंदे गटाच्या आमदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. त्यांचे निम्मे आमदार उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे नेते खासगीत ही बाब बोलून दाखवितात. याचाच अर्थ असा आहे की, विरोधक गोंधळलेले आहेत. शिंदे गट आणि अजित पवार गटात अस्वस्थतता असून उमेदवार निवडीसंदर्भात त्यांची दमछाक होत आहे. या सर्व परिस्थितीत महाविकास आघाडी महाराष्ट्रात तरी महायुतीचा विजय रथ रोखेल. विदर्भात काँग्रेसला अनुकूल असे वातावरण आहे. काँग्रेसचा पाचही जागांवर विजय होईल. लोकांमध्ये सत्ताधाऱ्यांबाबत प्रचंड नाराजी आहे. स्वतंत्र भारतात आपण गुलाम होऊ, अशी भीती लोकांना वाटत आहे. त्यामुळे भाजपाला सत्तेबाहेर काढायचे, असे लोकांनी ठरविले असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. वडेट्टीवार म्हणाले की, राहुल गांधी यांची विदर्भात जाहीर सभा होणार आहे. विदर्भातील लोकांचा पाठिंबा या सभेला मिळेल. राहुल गांधी यांनी त्याग आणि संघर्ष सुरू केला आहे. त्यामुळे राहुल गांधी यांच्याबद्दल एक वेगळे वातावरण सामान्य जनतेमध्ये निर्माण झाले आहे. त्यांच्या सभेला प्रचंड गर्दी होईलच. तसेच पाचही लोकसभा मतदारसंघात या सभेमुळे एक परिवर्तनाची लाट निर्माण झाल्याचे दिसेल. सांगलीच्या जागेबाबत आता वाद घालण्यात अर्थ नाही, असे सांगताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, सांगली मतदारसंघावर सुरुवातीपासूनच काँग्रेसचा दावा होता. पण आता आम्ही हा विषय ताणून धरणार नाही. आमचे पक्षश्रेष्ठी याबाबत निर्णय घेणार आहे परंपरागत जागा दुसऱ्या पक्षाला गेल्यानंतर सुरुवातीला थोडी नाराजी असते. पण ती दूर करण्याचा प्रयत्न करू.विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही माध्यमांशी बोलताना शिंदे गटावर जोरदार टीका केली. ‘ना घर का ना घाट का’, अशी शिंदे गटाची अवस्था झाल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

### काँग्रेसचा पाचही जागांवर विजय होईल

» शिंदे गटावर टीका करताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले, ‘ना घर का ना घाट का’, अशी वेळ शिंदे गटावर आली आहे. उद्धव ठाकरे भेटत नाही, अशी सबब सांगून शिंदे गट बाहेर पडला. पण आता त्यांना लोकसभेचे मतदारसंघही भेटत नाहीत, हे सर्वच पाहतायत. शिंदे गटाच्या आमदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. त्यांचे निम्मे आमदार उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे नेते खासगीत ही बाब बोलून दाखवितात. याचाच अर्थ असा आहे की, विरोधक गोंधळलेले आहेत. शिंदे गट आणि अजित पवार गटात अस्वस्थतता असून उमेदवार निवडीसंदर्भात त्यांची दमछाक होत आहे. या सर्व परिस्थितीत महाविकास आघाडी महाराष्ट्रात तरी महायुतीचा विजय रथ रोखेल. काँग्रेसचा पाचही जागांवर विजय होईल. लोकांमध्ये सत्ताधाऱ्यांबाबत प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे भाजपाला सत्तेबाहेर काढायचे, असे लोकांनी ठरविले असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. वडेट्टीवार म्हणाले की, राहुल गांधी यांची विदर्भात जाहीर सभा होणार आहे.

---

# उमेदवाराला विजयी करण्यासाठी ‘मिसळ पे चर्चा’

## संजय मंडलिक यांना वियजी करण्यासाठी रणनीती आखली

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्ष आपल्या उमेदवारांच्या विजयासाठी कामाला लागले आहेत. महायुतीमध्ये लोकसभेच्या काही जागांवरून जोरदार रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**



ज्या मतदारसंघात उमेदवारांची नावे जाहीर झाले आहेत, तेथे प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आहे. काही ठिकाणी प्रचारासाठी आणि उमेदवार कशा पद्धतीने निवडून येतील, यासंदर्भात रणनीती ठरवली जात आहे. आता कोल्हापूरमध्ये उमेदवाराला विजयी करण्यासाठी चक्क ‘मिसळ पे चर्चा’ करत पुढील रणनीती ठरविण्यात आली आहे.कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजय मंडलिक यांना वियजी करण्यासाठी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ‘मिसळ पे चर्चा’चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व नेत्यांनी या बैठकीला हजेरी लावली होती. या बैठकीत संजय मंडलिक यांच्या प्रचारासाठी प्रचार यंत्रणा कशा पद्धतीने राबवावी, निवडणुकीत कशा पद्धतीने प्रचार करावा तसेच उमेदवाराचा विजय होण्याच्या दृष्टीने रणनीती काय असावी? यासह आदी महत्वाच्या विषयांवर चर्चा झाल्याची माहिती राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी दिलीयावेळी लोकसभेच्या निवडणुकीत त्यांचा विजय होईल, असा विश्वास आहे. मात्र, त्यासाठी प्रचार यंत्रणा कशा पद्धतीने राबविण्यात यावी, यासाठी ही बैठक होती. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचा मोठा विकास केला आहे. देशातील जनतेला अपेक्षित असे काम त्यांच्या माध्यमातून झाले आहे. त्यामुळे आता मतदारही मतदान करण्यासाठी तयार आहेत. आम्हाला खात्री आहे की, आमचा अबकी बार ४०० पारचा दिलेला हा नारा नक्की पूर्ण होईल. तसेच कोल्हापूर जिल्ह्याचे संजय मंडलिक आणि धैर्यशील माने हे वियजी झालेले दिसतील”, असे राजेश क्षीरसागर म्हणाले.

### महायुतीच्या नेत्यांनी बैठकीला हजेरी

» काही ठिकाणी प्रचारासाठी आणि उमेदवार कशा पद्धतीने निवडून येतील, यासंदर्भात रणनीती ठरवली जात आहे. आता कोल्हापूरमध्ये उमेदवाराला विजयी करण्यासाठी चक्क ‘मिसळ पे चर्चा’ करत पुढील रणनीती ठरविण्यात आली आहे.कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजय मंडलिक यांना वियजी करण्यासाठी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ‘मिसळ पे चर्चा’चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व नेत्यांनी या बैठकीला हजेरी लावली होती.

# ‘वंचित’ वारंवार उमेदवार बदल का?

## महायुतीला फायदा होऊ शकतो अशाच ठिकाणी उमेदवार बदल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वंचित बहुजन आघाडीने पूर्वी घोषित केलेले उमेदवार बदलण्याचा सपाटा लावल्याने त्यांच्यावर ही वेळ का आली याबाबत राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. जेथे जेथे महायुतीला फायदा होऊ शकतो अशाच ठिकाणी हा उमेदवार बदल केल्याचे दिसून येत आहे.निवडणूक घोषणेपूर्वी महाविकास आघाडीसोबत चर्चा करणारे वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी नंतर स्वतंत्रपणे काही उमेदवारांची यादी घोषित केली होती. त्यानंतर आता काही ठिकाणी बदल केले जात आहेत. विदर्भातील रामटेक लोकसभा मतदारसंघात वंचितने शंकर चहांदे यांना उमेदवारी दिली होती. त्यांनी अर्जही भरला होता. बुधवारी अचानक त्यांनी या मतदारसंघातील अपक्ष उमेदवार किशोर गजभिये यांना पाठिंबा दिला. वंचितच्या या निर्णयाचा फायदा शिंदे गटाच्या उमेदवाराला होण्याची शक्यता आहे.**

अमरावती लोकसभा मतदार संघात पूर्वी वंचितने प्राजक्ता पिल्लेवान यांना उमेदवारी घोषित केली होती. मात्र त्यांनी अर्ज भरला नव्हता. २ एप्रिलला रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यांना वंचित बहुजन आघाडीकडून पाठिंबा अपेक्षित होता. पण वंचितने तो न दिल्याने आंबेडकर यांनी बुधवारी रात्री पत्रक काढून निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली. पण, गुरुवारी दुपारी वंचितने आंबेडकर यांना पाठिंबा जाहीर केला. मात्र त्याचा फायदा झाला नाही, आंबेडकर यांनी माघारीच्या निर्णयावर आपण कायम असल्याचे जाहीर केले. सध्या येथे वंचितचा उमेदवारच नाही. मराठवाड्यात परभणीमध्ये वंचितने बाबासाहेब उगले यांच्या नावाची घोषणा केली होती. मात्र आता त्यांच्याऐवजी पंजाबराव डक यांना उमेदवारी दिली आहे. डक हे हवामानाचा अंदाज व्यक्त करणारे म्हणून ओळखले जातात. ते मराठा आहेत. उद्धव ठाकरे गटाचा उमेदवारही मराठा आहे. परभणीतील मराठा केंद्रीत राजकारण बघता डक यांच्या उमेदवारीमुळे मराठा मतांचे विभाजन होऊन त्याचा फायदा महायुतीच्या महादेव जानकर यांना होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात परभणीमध्ये वंचितने पंजाबराव डक यांना उमेदवारी दिली आहे. डक यांच्या उमेदवारीमुळे मराठा मतांचे विभाजन होऊन त्याचा फायदा महादेव जानकर यांना होण्याची शक्यता आहे.ज्या पक्षाला समर्थन जाहीर केले, त्या पक्षाच्या प्रचारात संमतीशिवाय सहभागी होऊ नये, असे नवीन पत्र वंचितने काढल्याने कार्यकर्ते संभ्रमित झाले आहेत. एकीकडे काही जागांवर काँग्रेस आणि राष्ट्रवादीला समर्थन देत असताना या पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी नवीन पत्र काढले. त्या पत्राद्वारे पक्षाच्या सर्व जिल्हाध्यक्षांना मित्रपक्षाच्या प्रचाराला सूचना मिळाल्याशिवाय जाऊ नये, असे बजावण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीने काही ठिकाणी मित्रपक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा दिला आहे. त्या मित्रपक्षांचे पदाधिकारी किंवा उमेदवार वंचितच्या स्थानिक कार्यकर्त्यांना प्रचारात सहभागी करून घेण्यासाठी संपर्क साधत आहेत. परंतु, वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हास्तरावरील कार्यकर्त्यांना व पदाधिकारी यांनी प्रदेश कार्यालयातून पक्षाची सूचना प्राप्त झाल्याशिवाय मित्रपक्षाच्या प्रचारात सहभागी होऊ नये, असे रेखा ठाकूर यांनी पत्राद्वारे पक्षाच्या सर्व जिल्हाध्यक्षांना कळवले आहे.

### मराठा मतांचे विभाजन

» पण, गुरुवारी दुपारी वंचितने आंबेडकर यांना पाठिंबा जाहीर केला. मात्र त्याचा फायदा झाला नाही, आंबेडकर यांनी माघारीच्या निर्णयावर आपण कायम असल्याचे जाहीर केले. सध्या येथे वंचितचा उमेदवारच नाही. मराठवाड्यात परभणीमध्ये वंचितने बाबासाहेब उगले यांच्या नावाची घोषणा केली होती. मात्र आता त्यांच्याऐवजी पंजाबराव डक यांना उमेदवारी दिली आहे. डक हे हवामानाचा अंदाज व्यक्त करणारे म्हणून ओळखले जातात. ते मराठा आहेत. उद्धव ठाकरे गटाचा उमेदवारही मराठा आहे. परभणीतील मराठा केंद्रीत राजकारण बघता डक यांच्या उमेदवारीमुळे मराठा मतांचे विभाजन होऊन त्याचा फायदा महायुतीच्या महादेव जानकर यांना होण्याची शक्यता आहे.डक यांच्या उमेदवारीमुळे मराठा मतांचे विभाजन होऊन त्याचा फायदा महादेव जानकर यांना होण्याची शक्यता आहे.त्या पक्षाच्या प्रचारात संमतीशिवाय सहभागी होऊ नये, असे नवीन पत्र वंचितने काढल्याने कार्यकर्ते संभ्रमित झाले आहेत. एकीकडे काही जागांवर काँग्रेस आणि राष्ट्रवादीला समर्थन देत असताना या पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी नवीन पत्र काढले. त्या पत्राद्वारे पक्षाच्या सर्व जिल्हाध्यक्षांना मित्रपक्षाच्या प्रचाराला सूचना मिळाल्याशिवाय जाऊ नये, असे बजावण्यात आले आहे.

अमरावती लोकसभा मतदार संघात पूर्वी वंचितने प्राजक्ता पिल्लेवान यांना उमेदवारी घोषित केली होती. मात्र त्यांनी अर्ज भरला नव्हता. २ एप्रिलला रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यांना वंचित बहुजन आघाडीकडून पाठिंबा अपेक्षित होता. पण वंचितने तो न दिल्याने आंबेडकर यांनी बुधवारी रात्री पत्रक काढून निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली.

# काँग्रेसचे मानसिक संतुलन ढळले : हेमा मालिनी

## महिलांचा सन्मान कसा करायचा, हे मोदी यांच्याकडून शिकावे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मथुरेच्या खासदार आणि उमेदवार हेमा मालिनी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधाने केल्याचा आरोप भाजपने काँग्रेस नेत्यांवर केला आहे. काँग्रेस नेते चरणदास महंत यांनी मोदी यांच्याबाबत तर पक्षाचे प्रवक्ते रणदीप सुरजेवाला यांनी हेमा मालिनींबाबत कथितरित्या टिप्पणी केली आहे. यावर सार्वत्रिक हल्ला चढविताना काँग्रेस नेत्यांचे संतुलन ढळल्याचा आरोप भाजपने केला.**



भाजपच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी महंत आणि सुरजेवाला यांच्या भाषणांच्या ध्वनिचित्रफिती गुरुवारी प्रसृत केल्या. महंत यांच्या ध्वनीचित्रफितीमध्ये “आपल्याला कुणीतरी असा हवा आहे, की जो लाठी घेईल आणि नरेंद्र मोदी यांचे डोके फोडेल” असे ते म्हणताना दिसत आहेत. तर सुजरेवाला हे एका सभेमध्ये केलेल्या भाषणात अभिनेत्री आणि नेत्या असलेल्या हेमा मालिनींबद्दल आक्षेपार्ह शब्दांत टीका करताना दिसत आहेत. हा केवळ मालिनी यांचाच अपमान नसून सर्व स्त्रियांचा अपमान आहे, अशी शब्दांत मालवीय यांनी तोफ डागली. तर महिलांचा सन्मान कसा करायचा, हे काँग्रेसने पंतप्रधान मोदी यांच्याकडून शिकावे, असा सल्ला भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी दिला. तसेच जसजशी निवडणूक जवळ येत आहे, तसतसा लोकांचा पंतप्रधानांना वाढता पाठिबा दिसून येत आहे. त्यामुळे काँग्रेस नेत्यांचे मानसिक संतुलन ढासळले आहे, असा हल्लाबोल त्रिवेदी यांनी केला.सुरजेवाला यांनी सर्व आरोप फेटाळून लावले असून अर्धवट चित्रफीत दाखवून आपल्या विधानाचा विपर्यास केल्याचा पलटवार केला. भाजपच्या माहिती तंत्रज्ञान विभागाला असत्य पसरविण्याची सवय लागली आहे, असे ते म्हणाले. सुरजेवाला यांच्या कथित विधानाची राष्ट्रीय महिला आयोगाने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. ‘सुरजेवाला यांचे विधान हे महिलाविरोधी आणि महिलांच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचविणारे आहे. रेखा शर्मा यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहिले असून सुरजेवाला यांच्यावर तातडीने कारवाई करून तीन दिवसांत कृतीअहवाल सादर करण्यास सांगितले आहे,’ असे महिला आयोगाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### हा सर्व स्त्रियांचा अपमान आहे

» भाजपच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी महंत आणि सुरजेवाला यांच्या भाषणांच्या ध्वनिचित्रफिती गुरुवारी प्रसृत केल्या. महंत यांच्या ध्वनीचित्रफितीमध्ये “आपल्याला कुणीतरी असा हवा आहे, की जो लाठी घेईल आणि नरेंद्र मोदी यांचे डोके फोडेल” असे ते म्हणताना दिसत आहेत. तर सुजरेवाला हे एका सभेमध्ये केलेल्या भाषणात अभिनेत्री आणि नेत्या असलेल्या हेमा मालिनींबद्दल आक्षेपार्ह शब्दांत टीका करताना दिसत आहेत. हा केवळ मालिनी यांचाच अपमान नसून सर्व स्त्रियांचा अपमान आहे, अशी शब्दांत मालवीय यांनी तोफ डागली.

# दारु प्यायल्यानंतर अक्षय कुमार काय करतो?

बॉलीवूडच्या सुपरस्टार्समध्ये खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमारचं नाव घेतलं जातं. तो त्याच्या फिटनेस आणि हेल्थच्या बाबतीत कायमच गंभीर असतो. त्यासाठी तो दारु काय चहा सुद्धा पित नाही. पण एकदा अक्षयने खुलासा केला होता की, वाईन प्यायल्यानंतरही त्याला नशा चढते. तेव्हा तो काय करतो याबाबत एक मजेदार किस्सा देखील त्याने या कार्यक्रमादरम्यान सांगितला आहे. अक्षयने सलमान खानच्या दस का दम या कार्यक्रमात हजेरी लावली होती. त्यावेळी त्याने याबाबत मजेशीर खुलासा केला आहे. यावेळी त्याने सांगितलं की, जेव्हा मला वाईन चढते तेव्हा मी जेवण बनवायला लागतो. अक्षयचा हाच व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. यामध्ये अक्षय कुमारने सांगितलं आहे की, त्याला थोडी वाईन जरी प्यायली तरी त्याची नशा चढते. पण त्याला नशा चढल्यावर तो गात किंवा नाचत नाही, तर जेवण बनवून त्याच्या बायकोला ट्विंकल खन्नाला भरवतो. अक्षयच्या या उत्तरावर कार्यक्रमात एकच हशा पिकला. यावर बोलताना अक्षय कुमारनं म्हटलं की, मी थोडी जरी वाईन पिली तर ती मला चढते. नशेत लोकं खूप काही करतात. काही गातात, काही पडतात रागावतात पण मी जेवण बनवायला सुरुवात करतो. तेव्हा मी माझ्या लायकीवर येतो. खरतर अक्षय ॲक्टर बनण्याआधी शेफ होता. तो कॅनडामध्ये शेफ म्हणून काम देखील करत होता. अक्षयने सांगितलं की, मी फक्त कुकिंगच नाही करत तर ते मी बायकोला देखील भरवतो.

# पुष्पा 2 मधील लक्ष वेधणारा 'श्रीवल्ली'चा लूक

बॉक्स ऑफिसवर कोटींची कमाई केल्यानंतर पुष्पाचा सिक्वेल 'पुष्पा-2'प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटातील अल्लू अर्जुनने साकारलेल्या पुष्पा या व्यक्तिरेखेसोबत रश्मिकाने साकारलेल्या श्रीवल्ली ही व्यक्तिरेखाही प्रेक्षकांना भावली होती. चित्रपटातील 'श्रीवल्ली' या गाण्याने चांगलाच धुमाकूळ घातला होता. आता रश्मिका मंदानाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'पुष्पा -2' निर्मात्यांनी श्रीवल्लीचा फर्स्ट लूक समोर आला आहे. पोस्टरमध्ये श्रीवल्लीने साडी नेसील असून ज्वेलरी परिधान केली आहे. कपाळावर असलेल्या कुंकूने आणि गळ्यात असणाऱ्या डोरल्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. रश्मिकाच्या डोळ्यात काहीसा आक्रमकपणा आहे. लोकांचे हृदय चोरणारी श्रीवल्ली उर्फ रश्मिकाला वाढदिवसाच्या शुभेच्छा अशी कॅप्शन देण्यात आली आहे. चाहत्यांकडून रश्मिकाच्या या लूकवर कौतुकाचा वर्षावर सुरू आहे. एका युजरने श्रीवल्ली असे लिहित फायर इमोजी पोस्ट केली आहे. अनेक चाहत्यांनी हार्ट आणि फायर इमोजी पोस्ट करत आहेत. अल्पावधीतच लाखो लोकांनी या पोस्टला लाईक केले आहे.'पुष्पा 2 द रुल'चा टीझर रिलीजसाठी तयार आहे. या चित्रपटाचा टीझर 8 एप्रिल रोजी लॉंच होणार आहे. श्रीवल्लीच्या फर्स्ट लूकसह निर्मात्यांनी ही माहिती दिली आहे. 'पुष्पा 2' मध्ये अल्लू अर्जुन, फहद फासिल, रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.

# सुंदर गातात डॉ. नेने



अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि तिचे पती डॉ. श्रीराम नेने बॉलीवूडमधील लोकप्रिय जोडपं. दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. ते व्हिडिओ व फोटो शेअर करत असतात. डॉ. नेनेंनी आता त्यांच्या एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यात ते दोघेही एड शीरनचं लोकप्रिय गाणं गाताना दिसत आहेत. डॉ. नेनेंनी इन्स्टाग्रामवर त्यांचा व माधुरीचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. यात माधुरी एड शीरनचं 'परफेक्ट' गाणं गाताना दिसते. नंतर डॉ. नेनेही तिच्याबरोबर हे गाणं म्हणतात. 'आमच्या आवडत्या गाण्यांपैकी एक 'परफेक्ट' गाताना नेहमी खूप मजा येते' असं कॅप्शन डॉ. नेनेंनी या व्हिडिओला दिलं आहे. याचबरोबर त्यांनी एड शीरनला टॅगही केलं आहे.डॉ. नेने व माधुरीच्या या व्हिडीओवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. दोघांनी खूप छान गाणं गायलं, असं चाहते म्हणत आहेत. 'किती गोड,' 'माहित नव्हतं डॉ. नेने इतकं छान गातात', 'खूप छान', 'गाणं खूप आवडलं' अशा कमेंट्स या व्हिडीओवर आहेत.माधुरी दीक्षितच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास जानेवारीमध्ये तिचा मराठी सिनेमा 'पंचक' प्रदर्शित झाला होता. माधुरी व डॉ. नेने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली होती. माधुरी सध्या 'डान्स दिवाने' चं परीक्षण करत आहे.

# नेत्रा करणार अस्तिकाचा शेवट

'सातव्या मुलीची सातवी मुलगी' ही मालिका सध्या रंजक वळणावर आहे. तसेच लवकरच या मालिकेत मोठी ट्वीस्ट पाहायला मिळणार आहे. कारण लवकरच त्रिनयना देवी अस्तिकाचा शेवट करणार आहे. अस्तिका विरोचकाने दिलेला काळा मणी तिच्याकडे असल्यामुळे सुरक्षित रहात होती. पण ही गोष्ट नेत्राला कळते आणि ती हीच गोष्ट अद्वैतला सांगते. त्याचवेळी रुपालीसुद्धा अस्तिकाला सांगते की अव्दैत-नेत्रा दोघे मिळून तुझा वध करण्याचा प्रयत्न करतील. सध्या मालिकेत अस्तिका ही नेत्रा म्हणून वावरत आहे. त्याचप्रमाणे ती नेत्राला त्रिनयना देवीच्या मूर्तीच्या जागी विरोचकाची मूर्ती आणण्याचं देखील आव्हान देते. पण नेत्रा मात्र अस्तिकाला जशासं तसं उत्तर देते. त्याचसाठी नेत्रा आणि अद्वैत मिळून अस्तिकाचा वध करण्याची योजना आखत असतात. घरातले सगळेजणही त्यांना साथ देतात. पण रुपाली अस्तिकाला सांगते की, ते तुला संपण्याआधीच तू अद्वैतचा जीव घे आणि नागरुपात येऊन खोलीत लपून रहा. दरम्यान रुपालीच्या सांगण्यामुळे अस्तिका पूर्णपणे गोंधळून जाते. काय करावं हेच तिला कळत नाही. त्यानंतर ती अद्वैतच्या प्रेमळ बोलण्यात अडकते. तरीही रूपाली अस्तिकाला अव्दैतच्या जाळ्यातून सोडवते आणि तिला सांगते, की अव्दैतला पुन्हा मारण्याचा प्रयत्न कर.नेत्रा विरोचकाची खेळी पूर्णपणे ओळखते आणि घरातल्या सर्वांना एकत्र रहा असं सांगते. त्यानंतर नेत्रा अस्तिकाचा वध करण्यासाठी काय मार्ग असू शकेल, यावर विचार करते.'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मध्ये विरोचक आणि त्रिनयना देवीच्या मुलींमध्ये युद्ध होईल. या युद्धात विरोचकाचा शेवट झाल्यानंतर मालिकेचा शेवट होईल असेही त्यांनी सांगितले. विरोचक संपल्यानंतर मालिकेला काही अर्थच राहणार नाही, त्यामुळे मालिका संपू शकते असा अंदाज त्यांनी वर्तवला.

# लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का?



ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे. या सिनेमावरुन बरीच उलटसुलट चर्चा झाली. तसंच सिनेमाचा ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा त्यातल्या एका संवादावरुन रश्मिका मंदानाला चांगलंच ट्रोल करावं लागलं. या ट्रोलिंगवर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे. ट्रेलरमध्ये जो प्रसंग दाखवण्यात आला होता त्यात रश्मिका मंदाना करवा चौथच्या दिवशी रणबीरवर चांगलीच चिडलेली असते. तसंच रागाच्या भरात ती एक वाक्य बोलून जाते ज्यानंतर रणबीर चिडतो. जे वाक्य ती बोलत असते त्याचा काहीही संदर्भ लागला नसल्याने रश्मिका मंदानाला खूप ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. अगदी ती काय बोलते ते समजत नसल्यापासून ते तिने तोंडात सुपारी ठेवून संवाद म्हटला आहे का? इथपर्यंत अनेक प्रकारे तिला ट्रोल केलं गेलं. या सगळ्या प्रकारावर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे. नेहा धुपियाच्या नो फिल्टर नेहा या टॉक शोमध्ये रश्मिका आली होती. त्या शोमध्येच तिने या मुद्द्यावर मौन सोडलं आहे."करवा चौथचा तो प्रसंग नऊ मिनिटांचा होता. तो सीन शूट करताना सेटवर जितके लोक होते त्या सगळ्यांना आवडला होता. नऊ मिनिटांचं ते शूट संपल्यावर सगळ्यांनीच टाळ्या वाजवल्या. तो सीन खूप चांगल्या प्रकारे शूट झाला असं सगळ्यांनीच सांगितलं. ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा एका डायलॉगवरुन मला प्रचंड ट्रोल करण्यात आलं. तेव्हा मी असा विचार केला की नऊ मिनिटांचा तो इतका लांबलचक सीन सेटवरच्या लोकांना आवडला होता, मग आता लोक आपल्याला ट्रोल का करत आहेत? मी जणू काही स्वतःभोवती एखादा फुगा फुगवून घेतला होता का? लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का? तुम्ही काय शूट केलं आहे ते लोकांना माहीत नसतं. त्यांनी १० सेकंदाचा तेवढा एक डायलॉग पाहिला आणि मला ट्रोल करायला सुरुवात केली." असं रश्मिकाने म्हटलं आहे. लोकांनी महिलेला तिच्या शरीरावरुन ट्रोल करणं, बॉडी शेमिंग ज्याला आपण म्हणतो ते मला मुळीच आवडत नाही. आता एखाद्या महिलेच्या शरीरावरुन तिला ट्रोल करता येत नसेल तर चित्रपट, त्यातला पेहराव, त्यातली भाषा, संवाद यावरुन ट्रोलिंग होतं. मी कसा परफॉर्मन्स दिला आहे हे मला माहीत आहे असं रश्मिका मंदानाने म्हटलं आहे.ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे.

# हार्दिक पांड्याचे कर्णधारपद धोक्यात?

## क्रिकेटवर्तुळात चर्चा; माजी क्रिकेटपटूंमध्ये मतमतांतरे

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदी निवड झाल्यापासून हार्दिक पंड्याला बऱ्याच टीकेला, शेरेबाजीला सामोरे जावे लागत आहे. अहमदाबाद, हैदराबादपाठोपाठ मुंबईत घरच्या प्रेक्षकांनीही हार्दिकला लक्ष्य केले. त्यातच मुंबईचा संघ सुरुवातीच्या तीनही 'आयपीएल' सामन्यांत पराभूत झाल्याने हार्दिकवर दडपण वाढत चालले आहे. त्यामुळे हार्दिकऐवजी पुन्हा रोहितकडे कर्णधारपद सोपवले जाऊ शकेल, अशी चर्चा क्रिकेटवर्तुळात सुरू झाली आहे. याबाबत माजी क्रिकेटपटूंमध्येही मतमतांतरे आहेत.**



"हार्दिकचे कर्णधारपद नक्कीच धोक्यात येऊ शकेल. फ्रेंचायझी क्रिकेटची मला जितकी समज आहे, त्यानुसार संघमालक मोठे निर्णय घ्यायला घाबरत नाहीत. मुंबई इंडियन्सच्या मालकांनी रोहितकडून कर्णधापद काढून घेत ते हार्दिककडे देण्याचे धाडस दाखवले. रोहितच्या नेतृत्वाखाली मुंबईने पाच 'आयपीएल' जेतेपदे मिळवली होती. आता हार्दिक कर्णधार झाल्यापासून मुंबईने एकही सामना जिंकलेला नाही. त्यातच त्याच्याकडून बऱ्याच चुकाही होत आहेत. त्यामुळे कर्णधारपद पुन्हा रोहितकडे गेल्यास आश्चर्य वाटणार नाही," असे भारताचा माजी क्रिकेटपटू मनोज तिवारी म्हणाला.माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग मात्र तिवारीशी सहमत नव्हता. "रोहितच्या नेतृत्वाखालीही मुंबईने यापूर्वी हंगामाची सुरुवात सलग पाच पराभवांनी केली आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्सचे व्यवस्थापन हार्दिकला कर्णधारपदावरून काढण्याची घाई करणार नाही," असे सेहवाग म्हणाला. "हार्दिकला पुरेसा वेळ दिला जाईल. मात्र, त्यानंतरही कामगिरीत सुधारणा न झाल्यास मुंबईच्या व्यवस्थापनाला काहीतरी निर्णय घ्यावा लागेल. यापूर्वी असे दोन-तीन फ्रेंचायझींच्या बाबतीत झाले आहे. चेन्नईने जडेजाला कर्णधारपद सोपविले होते. मात्र, त्याला अपयश आल्यानंतर हंगामाच्या मध्यातच धोनीने पुन्हा कर्णधारपद सांभाळले. तुम्ही केवळ तीन सामन्यांनंतर कर्णधार बदलू शकत नाही. सात सामन्यांनंतर कामगिरीच्या आधारे तुम्ही निर्णय घेऊ शकता," असेही सेहवागने सांगितले.मुंबईला पहिल्या सामन्यात गुजरात टायटन्सने पराभूत केले. दुसऱ्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादने विक्रमी धावसंख्या उभारत मुंबईवर मात केली. तिसऱ्या सामन्यात घरच्या मैदानावर मुंबईची फलंदाजी ढेपाळली आणि राजस्थान रॉयल्सने त्यांना पराभूत केले. त्यामुळे हार्दिकच्या नेतृत्वाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.भारताचा अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विन, माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी यापूर्वीच हार्दिकला पाठिबा दर्शवला होता. आता ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकल क्लार्कनेही हार्दिकची पाठराखण केली आहे. "मुंबईचे चाहते आपल्याच संघाच्या कर्णधाराविरुद्ध शेरेबाजी करत असल्याचे पाहून आश्चर्य वाटते. हार्दिकने यापूर्वी मुंबईच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे त्याला अशी वागणूक मिळायला नको. तो चांगल्या मन:स्थितीत आहे. शेरेबाजीचा त्याच्यावर फारसा परिणाम होणार नाही. हार्दिकने आता मुंबईला विजयपथावर आणणे आवश्यक आहेमुंबईत घरच्या प्रेक्षकांनीही हार्दिकला लक्ष्य केले. त्यातच मुंबईचा संघ सुरुवातीच्या तीनही 'आयपीएल' सामन्यांत पराभूत झाल्याने हार्दिकवर दडपण वाढत चालले आहे.

### मुंबईने एकही सामना जिंकलेला नाही

"हार्दिकचे कर्णधारपद नक्कीच धोक्यात येऊ शकेल. फ्रेंचायझी क्रिकेटची मला जितकी समज आहे, त्यानुसार संघमालक मोठे निर्णय घ्यायला घाबरत नाहीत. मुंबई इंडियन्सच्या मालकांनी रोहितकडून कर्णधापद काढून घेत ते हार्दिककडे देण्याचे धाडस दाखवले. रोहितच्या नेतृत्वाखाली मुंबईने पाच 'आयपीएल' जेतेपदे मिळवली होती. आता हार्दिक कर्णधार झाल्यापासून मुंबईने एकही सामना जिंकलेला नाही. त्यातच त्याच्याकडून बऱ्याच चुकाही होत आहेत. त्यामुळे कर्णधारपद पुन्हा रोहितकडे गेल्यास आश्चर्य वाटणार नाही," असे भारताचा माजी क्रिकेटपटू मनोज तिवारी म्हणाला. माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग मात्र तिवारीशी सहमत नव्हता. "रोहितच्या नेतृत्वाखालीही मुंबईने यापूर्वी हंगामाची सुरुवात सलग पाच पराभवांनी केली आहे.

# शशांक सिंग पंजाबच्या विजयाचा शिल्पकार

## रोहित शर्मा, विराट कोहली, अजिंक्य रहाणे सर्वांनाच टाकलं मागे

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल मध्ये आज पंजाब किंग्जला दुसरा विजय मिळाला आहे. पंजाब किंग्जनं टॉस जिंकून पहिल्यांदा बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला होता. शुभमन गिलच्या 89 धावांच्या जोरावर गुजरातनं 4 विकेटवर 199 धाव केल्या. पंजाब किंग्जनं शशांक सिंगच्याअर्धशतकाच्या आणि इम्पॅक्ट प्लेअर आशुतोष शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर विजय मिळवला. शशांक सिंगनं पंजाबच्या विजयाचा शिल्पकार ठरला.**



शशांक सिंग हा मूळचा छत्तीसगडचा खेळाडू आहे. आक्रमक फलंदाजीसाठी त्याची ओळख आहे. शशांक सिंग बॉलिंग देखील करु शकतो. आयपीएलच्या मिनी ऑक्शनच्या वेळी शशांक सिंगला संधी देण्यात कुठल्याही फ्रँचायजीनं पुढाकार घेतला नव्हता. पंजाब किंग्जनं शशांक सिंगला संघात घेतलं होतं मात्र काही कारणांमुळं त्यांना आपण चुकीच्या खेळाडूला संघात घेतल्याचं वाटलं होतं. काही काळानंतर गैरसमज दूर झाले आणि पंजाबनं शशांक सिंगला संघात घेतल्याचं जाहीर केलं होतं. पंजाब किंग्जकडून 61 धावांची खेळी करणाऱ्या शशांक सिंगला प्लेअर ऑफ द मॅच ट्रॉफी देण्यात आली. शशांक सिंगनं 29 बॉलमध्ये 61 धावांची खेळी केली. शशांकनं 210 च्या स्ट्राईक रेटनं धावा केल्या. शशांकनं 3 षटकार आणि चार चौकार लगावत 61 धावा केल्या आणि पंजाबला विजयाजवळ पोहोचवलं. शशांकनं पोस्ट मॅच प्रेझेंटेशनमध्ये क्रिकेटिंग शॉट खेळण्याचा सल्ला कोचनं दिल्याचं म्हटलं होतं. शशांक सिंगनं यापूर्वी आरसीबी विरुद्ध झालेल्या मॅचमध्ये देखील जोरदार फटकेबाजी केली होती. शशांकनं आरसीबी विरुद्ध 8 बॉलमध्ये 21 केल्या होत्या. पंजाब किंग्जनं यंदाच्या आयपीएलमध्ये दुसरा विजय मिळवला. जॉनी बेयरस्टोनं 22 धावा केल्या, याशिवाय प्रभासिमरन सिंगनं 35 , सिकंदर रझा 15, जितेश शर्मा 16 आणि आशुतोष शर्मानं 17 बॉलमध्ये 31 धावा केल्या आणि पंजाबच्या विजयात हातभार लावला. पंजाब किंग्जनं आजच्या मॅचमध्ये आशुतोष शर्माला इम्पॅक्ट प्लेअर म्हणून संघात स्थान दिलं होतं. जितेश शर्मा बाद झाल्यानंतर आशुतोष शर्मा मैदानात फलंदाजीसाठी उतरला. यावेळी त्यानं एक षटकार आणि तीन चौकारांच्या जोरावर 17 बॉलमध्ये 31 धावा केल्या. दरम्यान, आता पंजाब किंग्ज आयपीएलच्या गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे.

### आशुतोष शर्माची वादळी खेळी

गुजरात टायटन्स सहाव्या स्थानावर आहे. पंजाब किंग्ज 200 आणि त्यापेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग 6 वेळा करणारी एकमेव टीम ठरली आहे.पंजाब किंग्जनं टॉस जिंकून पहिल्यांदा बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला होता. शुभमन गिलच्या 89 धावांच्या जोरावर गुजरातनं 4 विकेटवर 199 धावा केल्या. पंजाब किंग्जनं शशांक सिंगच्याअर्धशतकाच्या आणि इम्पॅक्ट प्लेअर आशुतोष शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर विजय मिळवला.